महाराष्ट्र टाइम्स | मुंबई | रविवार, १ डिसेंबर २०२४

के. के. चौधरी



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून मार्च २०२५अखेर विमानोड्डाण करण्याचा राज्य सरकारचा निश्चय असल्यामुळे सिडको व अदानी कंपनीद्वारे विमानतळ उभारणीचे काम जलदगतीने सुरू आहे. सद्यस्थितीत टर्मिनल १ व कार्गो टर्मिनलच्या कामाने वेग घेतला आहे. छायाचित्रात दिसत असलेले काम हे टर्मिनल १च्या मागील बाजूस असलेल्या कार्गो टर्मिनलचे आहे. या कार्गो टर्मिनलवरून पहिल्या टप्प्यात वर्षाला ०.८ मिलियन टन मालवाहतूक केली जाणार आहे. या कार्गो टर्मिनलला लागूनच जनरल एव्हीएशन टर्मिनलची उभारणी देखील केली जात आहे.

Find text or tools

नवराष्ट्र
Thane Navi Mumbai Plus Edition
Dec 02, 2024 Page No. 4

# सिडकोच्या भूखंडावर डेब्रिज टाकणाऱ्यांवर कारवाई

नवी मुंबई , (वा.) सिडको महामंडळाने संपादित केलेल्या तसेच संपादित करण्यात येत असलेल्या जमीनीवर आणि भूखंडावर मोठ्या प्रमाणात अनधिकृतपणे डंपर वाहन चालकाकडून डेब्रीज टाकण्यात येत आहे.या डेब्रीज मानवी आरोग्यास धोकादायक व पर्यावरणास हानीकारक असल्याचे सिडकोच्या निदर्शनास आले आहे. अनधिकृत डेब्रीजला आळा घालण्याच्या दृष्टीने मुख्य दक्षता अधिकारी, सिडको यांच्या नेतृत्वाखाली सिडकोकडूनकडून आता कारवाईला सुरुवात करण्यात आली आहे. दरम्यान, सिडको कार्यक्षेत्रात मोहिम राबवत असताना अधिकाऱ्यांना डम्पर चालक फुलचंद राममिलन साहनी हा व्यक्ती एमटीएचएल अटल सेतु, मुंबई ते उलवे रोड, सेक्टर-१२, उलवे नवी मुंबई येथे मोकळया जागेमध्ये डेब्रिज टाकण्याच्या प्रयत्नात असताना मिळून आला.